सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026
❑ वर्ष - ४ थे ❑ अंक - ३२ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ बुधवार दि. २५ फेब्रुवारी २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

# औषधी शेती लाभदायकच नव्हे पर्यावरण रक्षकही : राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू

## शेगाव येथे २५ ते २८ फेब्रुवारी दरम्यान चार दिवसीय राष्ट्रीय आरोग्य मेळावा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५शेगाव–** पारंपारिक शेतीला औषधी शेतीची जोड दिल्यास शेतकऱ्यांना साश्वत आर्थिक लाभ मिळेल तसेच जन सामान्यांच्या आरोग्याचे जतन करण्यास मदत होईल. औषधी शेती केवळ लाभदायकच नव्हे तर पर्यावरण रक्षक देखील असल्याचे प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केले.



आयुष चिकित्सा प्रणालीचा व्यापक प्रसार, प्रचार करण्यासाठी सामूहिक प्रयत्न करणे काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. केंद्रीय आयुष मंत्रालय आणि अखिल भारतीय आयुर्वेद महासंमेलन यांच्या संयुक्त विद्यमाने बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव येथे २५ ते २८ फेब्रुवारी दरम्यान चारदिवसीय राष्ट्रीय आरोग्य मेळाव्याचे बुधवारी मुर्मू यांच्या हस्ते उदघाटन झाले. गजानन महाराज संस्थानच्या विसावा मैदानावर हा चार दिवसीय मेळावा झाला.

समारंभास महाराष्ट्राचे राज्यपाल आचार्य देवव्रत, केंद्रीय आयुष, आरोग्य, कुटुंब कल्याण राज्य मंत्री प्रतापराव जाधव, केंद्रीय राज्य मंत्री रक्षा खडसे, पालकमंत्री मकरंद पाटील, राज्याचे कामगार मंत्री अडव्होकेट आकाश फुंडकर, जळगाव जामोदचे आमदार संजय कुटे, डॉक्टर आशुतोष गुप्ता, राजेश कोटेचा, प्रा. राकेश शर्मा, देवेंद्र त्रिगुणा यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी श्रीमती मुर्मू म्हणाल्या शेगाव च्या पवित्र, भूमीत आल्याने आपणास मनस्वी आनंद झाला. या अध्यात्मिक भूमीत आयुष मेळावा आयोजित करण्यात आला आहे. यामुळे हा मेळावा सर्वार्थाने यशस्वी ठरेल. आपले बालपण निसर्गाच्या सानिध्यात गेले. यामुळे, जडी बुटी, जंगल आयुर्वेद ची पूर्वीपासूनच मनस्वी आवड आहे. आताही मी आयुष चिकित्साला प्राधान्य देते. भारतीय आयुष प्रणालीला जगात मान्यता मिळावी यासाठी केंद्र सरकार भरीव प्रयत्न करीत आहे. आयुष शैक्षणिक, संशोधन संस्था अत्याधुनिक व्हाव्या यासाठी सरकार प्रयत्नशील आहे. यंदाच्या अर्थ संकल्पत आयुष साठी भरीव तरतूद करण्यात आली असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांनी शेगावात आयोजित आरोग्य मेळावा आरोग्य महाकुंभ ठरल्याचे सांगितले. शेतकऱ्यांना, आयुर्वेदिक शेती आणि उत्पादन कार्यक्रमात सक्रियपणे सहभागी होण्याचे आणि पारंपारिक पिकांसोबत औषधी वनस्पती लागवड करण्याचे आवाहन केले आहे.

ऋषीं म्हणजे त्या काळातील 'रिसर्च स्कॉलर ' असल्याचे सांगून त्यांनी त्या काळात केलेले संशोधन, आजच्या आधुनिक काळाच्याही कसोटीवर उतरले आहे, असे राज्यपाल म्हणाले. यावेळी पालकमंत्री मकरंद पाटील यांचेही समायोचित भाषण झाले. आयुष क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्धल त्रिगुणा, शर्मा, मनीषा कोठेकर यांचा सन्मानचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला.बुलढाणा जिल्ह्यातील राजकीय, आरोग्यसह विविध क्षेत्रातील मान्यवरासह नागरिक, विद्यार्थी यांची भरगच्च उपस्थिती होती.

# बारामती पोटनिवडणुकीत सुनेत्रा पवार रिंगणात

## पक्षाच्या कोअर कमिटीचे मोठे निर्णय; राज्यसभा आणि राष्ट्रीय अध्यक्षपद, राष्ट्रवादीत घडामोडींना वेग

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५ मुंबई–** बारामती विधानसभा मतदारसंघात लवकरच पोटनिवडणूक होण्याची चिन्हे स्पष्ट झाली आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनामुळे ही जागा रिक्त झाली. त्यानंतर निवडणूक आयोगाने या मतदारसंघासाठी विशेष संक्षिप्त मतदारयादी पुनरीक्षण कार्यक्रम जाहीर केला आहे. १ जानेवारी २०२६ पर्यंत नाव नोंदविलेल्या मतदारांना पोटनिवडणुकीत मतदानाचा अधिकार असेल. १० मार्च रोजी अंतिम मतदारयादी प्रसिद्ध केली जाणार असून त्यानंतर कोणत्याही क्षणी निवडणुकीची अधिकृत घोषणा होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, या पोटनिवडणुकीसाठी उमेदवाराबाबत महत्त्वाची माहिती समोर आली आहे. राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार बारामतीतून निवडणूक लढवणार असल्याचे पक्षातील सूत्रांनी सांगितले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या कोअर कमिटीच्या बैठकीत यावर एकमत झाल्याची माहिती आहे. पक्षाने ही निवडणूक शक्यतो बिनविरोध करण्याचा प्रयत्न करावा, अशी भूमिका बैठकीत मांडण्यात आली. प्रारूप मतदारयादी १० मार्चला जाहीर झाल्यानंतर राजकीय हालचालींना अधिक वेग येईल, असे चित्र आहे.



बारामतीतील या घडामोडींप्रमाणेच राज्यसभेच्या निवडणुकीबाबतही राष्ट्रवादी काँग्रेसने निर्णय घेतला आहे. आगामी राज्यसभा निवडणुकीत पार्थ पवार यांना उमेदवारी देण्याचा निर्णय पक्षाने घेतल्याची माहिती समोर आली आहे. सोमवारी रात्री मुंबईत झालेल्या कोअर कमिटीच्या बैठकीत त्यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले. ही बैठक प्रफुल पटेल यांच्या मुंबईतील निवासस्थानी पार पडली. बैठकीला पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे तसेच कोअर कमिटीचे अन्य सदस्य उपस्थित होते.

या बैठकीत २६ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या राष्ट्रीय अध्यक्ष निवडीसंदर्भातील राष्ट्रीय कार्यकारिणी बैठकीची तयारीही आढळून आली. येत्या काही दिवसांत वरळी डोम येथे राष्ट्रीय कार्यकारिणीची बैठक आयोजित केली जाणार आहे. या बैठकीत सुनेत्रा पवार यांच्या नावावर राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून अंतिम निर्णय होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळे पक्ष संघटनेत मोठे बदल होण्याची चिन्हे दिसत आहेत.

# राज्यसभेच्या ७ जागांसाठी आठवले निश्चित, उर्वरित तीनवर तगडी स्पर्धा

## वर्षा बंगल्यावर मॅरेथॉन बैठक; अंतिम यादीसाठी दिल्लीकडे मोर्चा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५मुंबई–**

महाराष्ट्रातील राज्यसभेच्या सात जागांसाठी १६ मार्च रोजी मतदान होणार आहे. उमेदवारी अर्ज भरण्यासाठी अवघे सहा दिवस उरले असल्याने राजकीय हालचालींना वेग आला आहे. भाजपच्या कोट्यातील चार जागांसाठी नावे ठरवण्याच्या पार्श्वभूमीवर मंगळवारी रात्री मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वर्षा निवासस्थानी पक्षाच्या कोअर कमिटीची बैठक झाली. या बैठकीला रविंद्र चव्हाण



यांच्यासह सुमारे १२ प्रमुख नेते उपस्थित होते. राज्यातील संख्याबळ आणि सहयोगी पक्षांचा विचार करून संभाव्य उमेदवारांवर सविस्तर चर्चा झाल्याची माहिती समोर येत आहे.

गेल्या काही दिवसांपासून भाजपकडून रामदास आठवले आणि विनोद तावडे यांना राज्यसभेत पाठवले जाईल, अशी जोरदार चर्चा होती. तसेच विजया रहाटकर यांचे नावही जवळपास निश्चित मानले जात होते. मात्र वर्षा बंगल्यावर झालेल्या बैठकीत ऐनवेळी दोन नवी नावे पुढे आली. त्यात ज्येष्ठ नेते रावसाहेब दानवे आणि भागवत कराड यांचा समावेश आहे. या घडामोडींमुळे चार जागांपैकी तीनसाठी चुरस वाढली आहे. आठवले यांचे नाव निश्चित मानले जात असले, तरी उर्वरित तीन जागांवर तावडे, रहाटकर, दानवे आणि कराड यांच्यापैकी कोणाला संधी मिळणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

अंतिम निर्णयासाठी पुढील पाऊल दिल्लीकडे वळणार आहे. प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण लवकरच दिल्लीला जाऊन भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन यांची भेट घेणार असल्याचे समजते. केंद्रीय नेतृत्वाशी चर्चा करूनच उमेदवारांची अंतिम यादी जाहीर केली जाणार आहे. त्यामुळे पुढील एक-दोन दिवसांत भाजपच्या राज्यसभा उमेदवारांची अधिकृत घोषणा होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. महायुतीच्या संख्याबळाचा विचार करता सातपैकी सहा जागांवर विजयाची गणिते त्यांच्या बाजूने असल्याचा पक्षाचा दावा आहे.

# राऊतांनी राज्यसभेसाठी आदित्य ठाकरे-प्रियांका चतुर्वेदींचा पत्ता कट केला

## मविआमध्ये काँग्रेसची अवस्था 'कढीपत्त्या'सारखी– नवनाथ बन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५ मुंबई** उबाठाचे प्रवक्ते संजय राऊत यांनी राज्यसभेसाठी प्रियांका चतुर्वेदी आणि आदित्य ठाकरे यांचा पत्ता कट केला. सुप्रिया सुळे यांनी स्पष्ट केले की शरद पवार निवडणूक लढवण्यासाठी इच्छूक आहेत, राऊत हे पहिल्या दिवसापासून हेच सांगत होते कारण शरद पवार यांचे नाव पुढे करायचे आणि आदित्य ठाकरे आणि प्रियांका चतुर्वेदी यांचा पत्ता कट करायचा हे धोरण संजय राऊत यांचे होते, असे भाजपचे मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांनी म्हटले आहे.



नवनाथ बन म्हणाले की, अजित पवार यांच्या अपघात प्रकरणी रोहित पवारांनी काही लढा दिला नाही, त्यांनी केवळ स्वत:ला प्रसिद्धी मिळावी यासाठी प्रयत्न केले आहेत. अजित पवारांचा वारसा आपल्याकडे मिळावा यासाठी त्यांचा प्रयत्न आहे.त्यासाठी अजित पवार यांच्या विमान अपघात प्रकरणी ते रोज पत्रकार परिषद घेत आहेत. राऊतांनी गुरूज करण्याचे काम रोहित पवारांनी केले आहे. ते जसे रोज सकाळी भोंगा वाजवतात पुरावे नसताना तसेच रोहित पवारांचा धंदा झाला

नवनाथ बन म्हणाले की, राज्यसभेच्या सातव्या जागेसाठी शरद पवारांचे नाव पुढे करत आदित्य ठाकरे आणि चतुर्वेदी यांना दूर करण्याचे काम राऊतांनी केले आहे.

चतुर्वेदींना संधी मिळाली तर पुढच्यावेळी आपला पत्ता कट होईल म्हणून त्यांनी त्यांना दूर केले. कारण चतुर्वेदी या आदित्य ठाकरेंच्या गटातील आहेत. आदित्य ठाकरेंच्या गटाला दूर ठेवण्याचे काम राऊतांनी केले आहे.

नवनाथ बन म्हणाले की, हर्षवर्धन सपकाळ यांची कितीही इच्छा असली की राज्यसभेची जागा काँग्रेसला मिळावी तरी सुद्धा काँग्रेसला मविआत कढीपत्तासारखे स्थान आहे.

त्यांचा वापर करत बाजूला फेकून दिले जाते. त्यांना ना राज्यसभेची उमेदवारी मिळणार आहे ना त्यांना विधान परिषदेची उमेदवारी मिळणार आहे. राज्यसभेसाठी शरद पवार, तर उबाठाकडून विधान परिषदेवर दावा करण्यात येत आहे. काँग्रेसला काहीही मिळणार नाही.

### मविआत वाद सुरू

नवनाथ बन म्हणाले की, मविआमध्ये तिन्ही पक्षामध्ये वाद आहेत. मविआतील ३ पक्षाचे तोंड ३ दिशेला आहेत. प्रत्येकाला आपला खासदार व्हावा, आपला आमदार व्हावा असे वाटत आहे. पण मविआही विचारांची लढाई लढणारी नाही तर केवळ सत्तेसाठीची आहे. मविआच्या ठिकऱ्या उडायला लागल्या आहेत. त्यांना राज्यात काहीही किंमत नाही. ५० जागा तिघांना मिळून निवडून आणता आलेल्या नाहीत.

# शरद पवार यांच्या राज्यसभेसाठी सुप्रिया सुळेंची संजय राऊतांशी चर्चा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५मुंबई –** अजित पवार यांच्या विमान अपघातप्रकरणी सखोल आणि पारदर्शक चौकशी व्हावी, अशी ठाम मागणी सुप्रिया सुळे यांनी केली आहे. रोहित पवार यांनी या प्रकरणात उपस्थित केलेल्या मुद्द्यांमध्ये तथ्य असेल, तर त्याची गांभीर्याने चौकशी झालीच पाहिजे, असे त्या म्हणाल्या. रोहितने अभ्यासपूर्वक पाठपुरावा केला असून त्याचा मला अभिमान वाटतो, असेही त्यांनी स्पष्ट केले. अजित पवारांच्या अपघातामागील सत्य समोर यावे, हीच आमची अपेक्षा आहे. कोणतीही शंका राहू नये म्हणून तपास प्रक्रिया पारदर्शक असणे अत्यावश्यक असल्याचे सुळे यांनी नमूद केले.



राज्यसभेच्या पार्श्वभूमीवर शरद पवार यांनी संसदेत जावे, अशी सर्वांची अपेक्षा असल्याचेही सुळे यांनी नमूद केले. यासंदर्भात त्यांनी महाविकास आघाडीतील काँग्रेस आणि शिवसेना नेत्यांशी चर्चा करणार असल्याचे सांगितले. अनिल देसाई आणि संजय राऊत यांच्याशी त्यांनी संपर्क साधला असून, संजय राऊत यांच्याशी चर्चा झाल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. पवार साहेबांशी सर्वांचे प्रेमाचे नाते आहे आणि ते राज्यसभेत असावेत, अशी भावना अनेकांच्या मनात आहे, असे सुळे म्हणाल्या. या सर्व घडामोडींमुळे राज्याच्या राजकारणात नवे समीकरणे तयार होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# मुंबई महापालिकेचा ८०९५२ कोटींचा अर्थसंकल्प

## विकासासाठी मोडणार ३६ हजार कोटींच्या ठेवी, गेल्या वर्षीच्या तुलनेत ८.७७ टक्के वाढ

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५मुंबई–** महापालिकेचे आयुक्त भूषण गगराणी यांनी आज सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी ८०९५२.५६ कोटी रुपयांचा अर्थसंकल्प स्थायी समितीचे अध्यक्ष प्रभाकर शिंदे यांना सादर केला. ज्यात ८९.८४ कोटी रुपयांची शिल्लक रक्कम दाखवण्यात आली आहे. गेल्या वर्षीच्या ७४४२७.४१ कोटी रुपयांच्या तुलनेत यंदाच्या अर्थसंकल्पात ८.७७ टक्क्यांची भरीव वाढ झाली असून, यामध्ये विकासकामांवर विशेष लक्ष केंद्रित करतानाच प्रशासकीय खर्चात कपात करण्याचे धोरण



अवलंबण्यात आले आहे. दरम्यान, विकासकामांसाठी निधी उभारण्याच्या उद्देशाने महापालिका आपल्या काही मुदत ठेवी मोडण्याच्या तयारीत असल्याची मोठी माहितीही या अर्थसंकल्पातून समोर आली आहे.

मुंबई महापालिकेकडे सध्या एकूण ८९४४९.३२ कोटी रुपयांच्या ठेवी असून, त्यापैकी ४४८२६.२३ कोटी रुपये हे 'राखीव' स्वरूपातील असल्याने त्यांना महापालिका स्पर्श करू शकत नाही. मात्र उर्वरित ३६६२३.०९ कोटी रुपयांच्या ठेवींचा वापर आगामी काळातील विविध विकास प्रकल्पांसाठी पूर्णत्वास नेण्यासाठी केला जाईल,

### ४० बाय ४० फुटांपेक्षा मोठ्या आकाराच्या जाहिरात फलकावर बंदी

मुंबई महानगरपालिकेने सार्वजनिक सुरक्षिततेला प्राधान्य देत जाहिरात फलकांबाबत अत्यंत कठोर नियमावली जाहीर केली आहे. नव्या नियमांनुसार, आता ४० बाय ४० फुटांपेक्षा मोठ्या आकाराचे जाहिरात फलक लावण्यावर पूर्णपणे बंदी घालण्यात आली असून, पदपथ आणि इमारतींच्या गच्चीवरही असे फलक लावण्यास मनाई करण्यात आली आहे. यापुढे अशा प्रकारच्या जाहिरातींसाठी कोणतीही नवीन परवानगी दिली जाणार नाही, ज्यामुळे अनधिकृत आणि धोकादायक फलकांना आळा बसून शहरात होणाऱ्या संभाव्य दुर्घटना टाळता येतील.

## संपादकीय ......

# शेतकरी आत्महत्येचा कलंक पुसा

*महाराष्ट्रात वाढत्या शेतकरी आत्महत्यांवर सरकारने टास्क फोर्स स्थापन करत हा विषय अजेंड्यावर आणला ते बरे झाले. या जिव्हाळ्याच्या आणि एकुणात कृषी समुदायाला दिलासा देणाऱ्या निर्णयाचे आजतरी स्वागत करायला हवे.*

*ज्येष्ठ कृषिशास्त्रज्ञ एम. एस. स्वामिनाथन यांनी व्यापक राष्ट्रीय कृषी धोरणावर आधारित दिलेल्या आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांची सखोल मांडणी करणाऱ्या अहवालाला वीस वर्षे लोटली. कृषी सुधारणांसाठी त्यांनी केलेल्या प्रमुख शिफारशी स्वीकारल्या गेल्या नाहीत. त्यातील काही सोयीच्या वा फारशा अडचणीच्या न ठरणाऱ्या तरतुदी धोरणात आणल्या गेल्या. मात्र, शेती तोट्याची बनल्याने होत असलेल्या शेतकरी आत्महत्यांवर ठोस मार्ग काढण्यात राज्यकर्त्यांना अपयश आले आहे, हे मान्य करावे लागेल. विकासाचे प्राधान्यक्रम ठरवताना डावलला गेलेला शेतकरीवर्ग, मध्यमवर्ग मतदाराचे जपले गेलेले ग्राहकहित, त्यातून अनुनयाचे राजकारण करताना शेती आणि शेतकऱ्याच्या प्रश्नांकडे कमालीचे दुर्लक्ष झाले. शेतकरी हा अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा घटक मान्य करण्यास अलिखित नकार दिला गेला. या वस्तुस्थितीमागील कारणांचा शोध घेण्याची तयारी ठेवावी लागेल. ती याचसाठी की, करभारात अडकलेल्या जागतिक व्यापाराच्या लाटा थोपवताना सरकारची दमछाक होताना दिसते. या लाटेत शेती-शेतकरी टिकवण्याचे आव्हान आणखी गडद झाले. आज या प्रश्नाचे गंभीर परिणाम दिसू लागल्याने त्याची दखल घेण्याशिवाय पर्याय उरलेला नाही.*

*वाढत्या शेतकरी आत्महत्या, अर्थव्यवस्थेतील शेतीची अपरिहार्य भूमिका, या पार्श्वभूमीवर हा निर्णय महत्त्वाचा ठरतो. तो घेताना शेतकरी आत्महत्यांचा हा विषय केवळ कर्जमाफीने किंवा तकलादू योजनांनी सुटणारा नाही, त्यासाठी आणखी एक ठोस पाऊल टाकण्याची गरज सरकारने मान्य केलेली दिसते. राज्याच्या विकासाचे प्रयत्न सुरू असताना सामाजिक विकासाचा आलेख घटता असेल, तर त्याला विकास तरी कसे म्हणावे? या विकास निर्देशांकात शेतकरी आत्महत्येचा कलंक कसा पुसावा, असा प्रश्न पडणे साहजिक आहे. त्याचे समाधानकारक उत्तर आता तरी शोधावे लागणार आहे. ते सरकारला कृतीतून द्यावे लागेल. टास्क फोर्सच्या कामाची रूपरेषा लक्षात घेता आत्महत्येमागील मानसिक, आर्थिक आणि सामाजिक कारणांवर बरीच चर्चा आधीच झाली आहे. त्याचे अहवाल सरकारकडे आहेत. आता नव्याने काय शोध घेणार? प्रश्न आहेच. सरकारच्या हेतूबद्दल संशय घेता येणार नसला, तरी आव्हान मोठे आहे.*

*ज्या सांख्यिकीच्या आधारे सरकारला जाग आली, ती धक्कादायक आणि अस्वस्थ करणारी आहे. आत्महत्या हा गुन्हा असल्याने पोलिस दफ्तरी झालेल्या नोंदीवरून पुढे आलेली ही आकडेवारी आहे. या गंभीर सामाजिक प्रश्नाचे मोजमाप करणारी स्वतंत्र यंत्रणाही अस्तित्वात नसावी, हे त्याहून गंभीर. राष्ट्रीय गुन्हे सांख्यिकी विभागाच्या २०२३ च्या आकडेवारीनुसार, महाराष्ट्र हा शेतकरी आत्महत्येचा देशातील प्रमुख 'हॉटस्पॉट' बनला आहे. गेल्या दोन वर्षांतील आकडेवारीही चिंतेत भर घालणारीच. शेतकरी आत्महत्या प्रभावग्रास्त राज्यांमध्ये महाराष्ट्राचा क्रमांक वरचा आहे, म्हणजे सुमारे ३९ टक्के. पाठोपाठ कर्नाटक २३ टक्के, आंध प्रदेश, मध्य प्रदेश, तामिळनाडू या राज्यांचा समावेश होतो. या अहवालातून आणखी एक धक्कादायक आकडेवारी समोर येते, ती म्हणजे शेतकरी आत्महत्या करतोच, त्याचबरोबर शेतमजूरही गळफास जवळ करतो आहे. या आकडेवारीनुसार, ४ हजार ६९० शेतकऱ्यांनी, तर ६ हजार ९६ शेतमजुरांनी आत्महत्या केल्या. त्यातही पुरुषांची संख्या अधिक. तुलनेत महिला हा मरणाचा मार्ग न स्वीकारता जगण्याच्या संघर्षाला हिमतीने, जबाबदारीने सामोऱ्या जाताना दिसतात.*

*देशातील एकूण आत्महत्याग्रास्तांपैकी सुमारे ६६ टक्क्यांहून अधिक शेतकरी आणि मजुरांचे वार्षिक उत्पन्न एक लाखापेक्षा कमी होते आणि आत्महत्येच्या प्राथमिक कारणांपैकी ते एक महत्त्वाचे आहे. गरिबी, दारिद्य्र, तुटपुंजी आणि न परवडणारी शेती, जगण्याच्या बंद झालेल्या अन्य वाटा, ऐन हंगामात धान्याचे दर पाडून शेतकऱ्याची सरकारी यंत्रणांच्या डोळ्यांदेखत केली जाणारी लूट, केवळ कागदावर राहिलेला शेतीमाल हमीभाव, लहरी निसर्ग, जलसिंचनाच्या सोयीसुविधांचा, शिक्षणाचा अभाव, कर्जबाजारीपणा, कुटुंबावरील वाढता खर्च, मुलांचे शिक्षण, सामाजिक दबाव, कर्त्या पुरुषातील व्यसनाधीनता, सामाजिक सुरक्षा योजनांचा अभाव, वैद्यकीय कारणासाठी होणारी लूट अशा काही प्रमुख कारणांनी ही शेतकरी कुटुंबे देशोधडीला लागली. मराठवाडा, विदर्भात मोठ्या संख्येने होणाऱ्या शेतकरी आत्महत्यांमागे दडलेल्या अन्य कारणांचाही शोध घ्यावा लागेल. यातील गंभीर वास्तव म्हणजे शेतमजूर हा मूळचा शेतकरी होता. मुंबईत स्थलांतरित झालेला मोठा वर्ग शेतीतून बाहेर फेकला गेलेला आहे. आत्महत्यांमागील आर्थिक, सामाजिक, मानसिक, कौटुंबिक कारणांचा शोध घेता या सर्वांच्या तळाशी शेतकरी कुटुंबाचे तोट्यातले, न परवडणारे अर्थकारण दडले आहे. कारणांचे मूळ येथे आहे. या शेतकरी कुटुंबांचे जीवनमान सुधारताना त्यांना कायमस्वरूपी आर्थिक स्थैर्य कसे मिळेल, त्यासाठीच्या प्रयत्नांवर धोरणकर्त्यांचा भर हवा. तो न दिल्यास विकासातील हा मोठा अडसर ठरू शकतो.*

# पारंपरिक पिकांना रामराम; कारल्याची गोडी का वाढतेय? वाचा सविस्तर




**दि.२५विदर्भ प्रजासत्ताक**

पारंपरिक पिकांच्या अनिश्चित उत्पन्नाला कंटाळून शेतकरी आता नगदी व भाजीपाला पिकांकडे वळत आहेत. उन्हाळ्यात पाण्याची टंचाई असतानाही योग्य नियोजन, ठिबक सिंचन आणि सुधारित वाणांचा वापर केल्यास कारले हे पीक शेतकऱ्यांसाठी फायदेशीर ठरत आहे.

सध्या बाजारात कारल्याला प्रतिकिलो ६० ते ८० रुपये दर मिळत असल्याने या पिकाकडे आकर्षण वाढले आहे.

**कमी पाणी, जास्त नफा**

उन्हाळ्यात पाण्याची मोठी अडचण भासते. मात्र, कारल्याला इतर पिकांच्या तुलनेत कमी पाणी लागते.ठिबक सिंचनाद्वारे दररोज झाडाला १ ते २ लिटर पाणी दिल्यास पाण्याची बचत होते. मल्चिंग पेपरचा वापर केल्यास तणांचे प्रमाण कमी राहते आणि मातीतील ओलावा टिकून राहतो.यामुळे उत्पादन खर्च कमी होऊन निव्वळ नफा वाढतो.

**वर्षभर मागणी; मर्यादित खर्च**

कारले हे वेलवर्गीय पीक असून वर्षभर बाजारात याला मागणी असते. मधुमेहासह विविध आजारांवर गुणकारी असल्याने ग्राहकांमध्ये याची मागणी स्थिर असते.

बियाणे व खतांचा खर्च तुलनेने कमी

पाण्याचा निचरा होणारी मध्यम ते भारी जमीन योग्य

उन्हाळी हंगामासाठी सुधारित वाणांची निवड फायदेशीर

योग्य व्यवस्थापन केल्यास उत्पादनात लक्षणीय वाढ

६० दिवसांत पहिला तोडा

लागवडीनंतर अवघ्या ५५ ते ६० दिवसांत पहिली काढणी सुरू होते. कारले हे झटपट उत्पन्न देणारे पीक असल्याने रोख प्रवाह लवकर सुरू होतो.

हे वेलवर्गीय पीक असल्यामुळे बांबू, तार किंवा नायलॉन जाळीचा मंडप (ताटी पद्धत) करणे आवश्यक आहे.

आधारावर वाढलेल्या वेलींना रोग कमी लागतात आणि फळांचा आकार व रंग अधिक आकर्षक राहतो.

काढणीनंतर प्रक्रिया नाही

हळद, सोयाबीनसारख्या पिकांवर काढणीनंतर प्रक्रिया किंवा साठवणूक करावी लागते. मात्र कारल्याच्या बाबतीत तसे नाही.

वेलीवरून फळ तोडले की ते थेट बाजारात विक्रीसाठी पाठवता येते. त्यामुळे वेळ, मजुरी आणि साठवणुकीचा खर्च वाचतो. पैसा थेट हातात येतो.

कीड नियंत्रण कसे कराल?

उन्हाळी कारल्यावर फळमाशी, मावा, पांढरी माशी, भुरी किडी व रोगांचा प्रादुर्भाव दिसू शकतो.

**उपाययोजना**

एकरी पिवळे व निळे चिकट सापळे लावावेत

फळमाशीसाठी कामगंध सापळ्यांचा वापर

रोग दिसताच कृषी तज्ज्ञांच्या सल्ल्याने बुरशीनाशक/कीटकनाशक फवारणी

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

बाजारभावाचा फायदा कसा घ्याल?

सध्या कारल्याला ६० ते ८० रुपये प्रतिकिलो दर मिळत असल्याने नियोजनबद्ध लागवड केल्यास चांगला नफा मिळू शकतो.

स्थानिक बाजारपेठेसोबतच शेजारच्या जिल्ह्यांतील घाऊक बाजारांशी संपर्क ठेवल्यास अधिक दर मिळण्याची शक्यता असते.

पाण्याची मर्यादित उपलब्धता, कमी खर्च, ६० दिवसांत काढणी आणि बाजारातील स्थिर मागणी या सर्व घटकांमुळे कारल्याची गोडी वाढताना दिसत आहे.योग्य तांत्रिक मार्गदर्शन, ठिबक सिंचन आणि कीडनियंत्रणाची काळजी घेतल्यास कारले हे पीक शेतकऱ्यांसाठी उन्हाळ्यातील हुकमी एक्का ठरू शकते.

# वजन कंट्रोलमध्ये हवं तर रात्री जेवणा नंतर फळं कधी-किती खावीत?



**दि.२५ विदर्भ प्रजासत्ताक**

आजकाल वजन कमी करण्यास प्रत्येकजण प्रयत्न करत अस काहीजण डाएट प्लॅन फॉलो करतात काहीजण जीममध्ये घाम गाळत अशा स्थितीत रोज रात्री फळं ख चांगलं ठरतं का असा प्रश्न उपस्ि होतो. काहीजणांच्या मते फळांचे से




केल्यानं वजन कमी होण्यास मदत होते. फळं खाल्ल्यानं शरीरावर काय परिणाम होतो समजून घेऊ.

**रात्री फळं खाल्ल्यानं वजन वाढतं का? –**फळांमध्ये नॅच्युरल शुगर म्हणजे फ्रक्टोज, फायबर्स, व्हिटामीन्स आणि मिनरल्स भरपूर प्रमाणात असतात. यात कॅलरीज कमी असतात आणि पोषण जास्त असते. फळ खाल्ल्यानं वजन वाढण्यास मदत होते. पण जर तुम्ही गरजेपेक्षा जास्त फळं खाल्ली तर तब्येतीचं नुकसान होऊ शकतं. खासकरून गोड फळं जसं की आंबा, चिकू, द्राक्ष यांसारख्या फळांमुळे शरीरात एक्स्ट्रा कॅलरीज जमा होतात. जर या कॅलरीज वापरल्या गेल्या नाहीत तर हळूहळू वजन वाढण्याचा धोका असतो.

**रात्री गोड खाल्ल्यास शरीर कसे काम करते?**– रात्री आपल्या शरीराचे मेटाबॉलिझ्म दिवसाच्या तुलनेत थोडं संथ होते कारण शरीर आरामाच्या स्थितीत असते. अशा स्थितीत जास्त गोड पदार्थ खाल्ल्यानं पचनावर परिणाम होऊ शकतो. जर तुम्ही झोपण्याआधी फळांचे सेवन केले तर पोटात जड वाटणं, गॅस होणं, शुगर लेव्हल अचानक वाढणं अशा समस्या उद्भवतात तर झोपेच्या गुणवत्तेवरही परिणाम होऊ शकतो. रात्री फळं खाणं चुकीचं नाही पण तुम्ही कोणती फळं खाता आणि किती प्रमाणात खाता यावर ते अवलंबून असते. जर तुम्ही रात्री हलका आहार घेतला असेल तर एक छोटी वाटी पपई, पेरू यांसारखे फायबर्सयुक्त फळं खाऊ शकता. ज्यामुळे पचनक्रिया चांगली राहते आणि कॅलरीजही जास्त घेतल्या जात नाहीत. फळं पोट भरतात पण कमी कॅलरीज देतात, फायबर्समुळे बराचवेळ भूक लागत नाही.

# १३ मार्चपासून हरियाणा येथे होणार 'आरएसएस'ची प्रतिनिधी सभा

## मोहिमांमधील अनुभव आणि अहवालांवर होणार विशेषतः चर्चा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५अमरावती–** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची (आरएसएस) अखिल भारतीय प्रतिनिधी सभा या वर्षी १३, १४ आणि १५ मार्च २०२६ रोजी हरियाणातील समलखा येथे आयोजित केली जात आहे. संघाच्या दृष्टिकोनातून, ही बैठक सर्वोच्च निर्णय घेणारी संस्था आहे. ही वार्षिक बैठक यावर्षी ग्राम विकास आणि सेवा साधना केंद्र, पट्टी कल्याण, समलखा, हरियाणा येथे आयोजित केली जात आहे.

या वर्षी संघाचे शताब्दी वर्ष असल्याने, या बैठकीत विजयादशमी उत्सव, घरगुती संपर्क, हिंदू परिषदा, युवा परिषदा, प्रमुख नागरिक बैठका आणि सामाजिक सलोखा बैठका यासारख्या शताब्दीनिमित्त आयोजित कार्यक्रम आणि मोहिमांमधील अनुभव आणि अहवालांवर विशेषतः चर्चा केली जाईल. प्रतिनिधी सभा गेल्या वर्षातील, २०२५-२६ च्या संघाच्या कार्याचा आढावा घेईल आणि प्रांतांमध्ये हाती घेतलेले विशेष कार्य सादर करेल. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची (आरएसएस) वार्षिक अखिल



भारतीय प्रतिनिधी सभा मागील वर्षी १५, १६ आणि १७ मार्च २०२४ रोजी विदर्भातील नागपूर येथील रेशीमबाग येथील स्मृती भवन कॅम्पसमध्ये झाली होती. या बैठकीत २०२३-२४ साठी संघाच्या कार्याचा आढावा घेण्यात आला होता. ही बैठक दर तीन वर्षांनी नागपूरमध्ये होत असून यामध्ये संघातील पदाधिकाऱ्यांची निवड केली जाते. तर दरवर्षी विविध भागात ही बैठक होते. यंदा हरीयाणामध्ये बैठक होणार आहे.

या बैठकीत सध्याच्या राष्ट्रीय परिस्थितीवर चर्चा होईल आणि काही महत्त्वाच्या विषयांवर ठराव मंजूर होतील. संघ शाखांकडून सामाजिक बदलासाठी आवश्यक असलेल्या प्रयत्नांवर, विशेषतः पंच परिवर्तन प्रयत्नांवर चर्चा अपेक्षित आहे. संघ शिक्षा वर्ग आणि कार्यकर्ता विकास वर्गासह इतर प्रशिक्षण वर्गांच्या योजनांवर चर्चा केली जाईल आणि येत्या वर्षासाठी संघाच्या कार्य योजनेचा निर्णय घेतला जाईल.

सरसंघचालक डॉ. मोहन भागवत, सरकार्यवाह दत्तात्रेय होसाबळे आणि सर्व सह-सरकार्यवाह आणि इतर पदाधिकारी तसेच कार्यकारी सदस्य बैठकीला उपस्थित राहतील. बैठकीत प्रामुख्याने निवडून आलेले प्रतिनिधी, राज्य आणि प्रदेश पातळीवरील प्रमुख पदाधिकारी असे एकूण १४८९ कार्यकर्ते उपस्थित राहण्याची अपेक्षा आहे. ३२ संघ प्रेरित संघटनांचे राष्ट्रीय अध्यक्ष, सरचिटणीस आणि संघटन मंत्री देखील बैठकीत उपस्थित राहण्याची अपेक्षा आहे.

# भरचौकात मारून टाकू, लवकरच चमत्कार दाखवू

## बिश्नोई टोळीचा हस्तक शुभम लोणकर याने १० कोटींची खंडणी मागत जीवे मारण्याची दिली धमकी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५अकोला :**

बिश्नोई टोळीकडून काँग्रेसचे आमदार साजिद खान पठाण यांना १० कोटीच्या खंडणीसाठी धमकीचा फोन आला होता. आमदार पठाण यांनी खंडणीसंदर्भात तक्रार दाखल केली आहे. सतर्कता म्हणून आमदार पठाण यांना सशस्त्र पोलिसांची सुरक्षा पुरवठण्यात आली.दरम्यान, बिश्नोई टोळीने आ.पठाणांना दिलेल्या धमकीची ध्वनीफित समाज माध्यमातून प्रसारित झाली आहे. 'दहा कोटी दे, अन्यथा बाबा सिद्दिकी सारखे हाल करू. भरचौकात मारून टाकू, लवकरच चमत्कार दाखवू,' अशी धमकी बिश्नोई टोळीचा हस्तक शुभम लोणकर याने दिली आहे.

जिल्ह्यातील दोन आमदारांना बिश्नोई टोळीकडून धमकी आली आहे. भाजप आमदार प्रकाश भारसाकळे यांना बिश्नोई टोळीकडून खंडणीसाठी धमकी आली. 'आमदार भारसाकडे यांच्याकडून दोन कोटी रुपये वसूल करून द्यावे, अन्यथा तुला आणि आमदाराला पाहून घेईल,' अशी धमकी बिश्नोई टोळीतील शुभम लोणकर याने दिली. त्यानंतर अकोला पश्चिमचे



काँग्रेस आमदार साजिद खान पठाण यांना देखील धमकीचा फोन आला.

बिश्नोई टोळीतील हस्तक शुभम लोणकर याने आमदार पठाण यांच्याशी भ्रमणध्वनीवरून संपर्क साधला. १७ फेब्रुवारीला दुपारी ३ वाजताच्या सुमारास हा कॉल आला होता. "दोन दिवसांत १० कोटी रुपये दे, अन्यथा तुझा गेम करू, अशी धमकी शुभम लोणकर याने दिली. या प्रकरणानंतर आमदार साजिद खान पठाण यांच्या सुरक्षेत वाढ केली. या घटनेच्या सात दिवसानंतर साजिद खान पठाण यांना दिलेल्या धमकीची ध्वनीफित समाजमाध्यमातून मंगळवारी प्रसारित झाली. त्यामुळे चांगलीच खळबळ उडाली आहे.

# सूर्यपुत्री तापीचे वरदान; मेळघाटातील आदिवासी अर्थकारणाला नवी संजीवनी

## नदीपात्रात टरबूज-खरबुज शेती बहरली; मासेमारी व रोजगारातून स्थलांतराला लगाम

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५चिखलदरा–**

मेळघाटातील दुर्गम व डोंगराळ भागात जीवनाचा आधार बनलेली 'सूर्यपुत्री' तापी नदी यंदाही आदिवासी बांधवांसाठी खऱ्या अर्थाने वरदान ठरत आहे. रखरखत्या उन्हाळ्यात अनेक पाणवठे आटत असताना तापीचा बारमाही प्रवाह या भागाला दिलासा देत आहे. पिण्याच्या पाण्याबरोबरच शेती, पाळीव जनावरे आणि वन्यजीवांसाठीही ही नदी जीवनवाहिनी ठरली आहे.महाराष्ट्र-मध्य प्रदेश सीमेवरून वाहणारी तापी नदी मेळघाटातील गावांच्या अर्थचक्राला गती देत आहे. विशेषतः उन्हाळ्यात नदीपात्रात आदिवासी शेतकऱ्यांनी घेतलेल्या टरबूज व खरबूज पिकांनी आर्थिक सुबत्ता निर्माण केली आहे. कमी पाण्यात आणि तुलनेने कमी खर्चात येणारी ही नगदी पिके अल्पभूधारकांसाठी



फायदेशीर ठरत आहेत. नदीकिनारी तयार झालेल्या सुपीक वाळूमिश्रित जमिनीत या पिकांचे उत्पादन चांगले येत असल्याने बाजारातही त्यांना मागणी आहे.नदीवर आधारित मासेमारी हा येथील पारंपरिक व्यवसाय असून शेकडो कुटुंबांची उपजीविका त्यावर अवलंबून आहे. नदीपात्रातील हंगामी शेती आणि मासेमारीमुळे स्थानिक तरुणांना गावातच रोजगार उपलब्ध झाला आहे. परिणामी, कामासाठी शहरांकडे होणारे स्थलांतर कमी होण्यास मदत झाली आहे.तापी नदीचा लाभ केवळ मानवापुरता मर्यादित नाही. मेळघाट व्याघ्र प्रकल्प परिसरातील वन्यप्राण्यांसाठीही ही नदी प्रमुख पाण्याचा स्रोत आहे. उन्हाळ्यात इतर जलस्रोत आटल्यावर व्याघ्र, हरिण, रानडुक्कर आदी प्राणी तापीच्या पात्रावरच तहान भागवताना दिसतात. त्यामुळे पर्यावरणाचा समतोल राखण्यातही नदीची महत्त्वाची भूमिका आहे.

पाणीपुरवठा, शेती, मासेमारी आणि पर्यावरण संवर्धन अशा बहुआयामी योगदानामुळे तापी नदीने मेळघाटातील आदिवासी अर्थकारणाला बळकटी दिली आहे. नैसर्गिक साधनसंपत्तीचा सुयोग्य वापर केल्यास ग्रामीण भागातही समृद्धी साध्य होऊ शकते, याचे उत्तम उदाहरण तापीच्या काठावर पाहायला मिळत आहे

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

बुधवार दि. २५ फेब्रुवारी २०२६

शहर/ग्रामिण

# ॲड. प्रशांत देशपांडे छत्रपती शिवाजी महाराज जयंती समितीचे स्वागताध्यक्ष

## ६ मार्चला भाजीबाजारातून निघणार महाशोभायात्रा ; तयारी सुरू

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२५अमरावती**

जुन्या अमरावती शहरातील भाजीबाजार परिसरात श्री छत्रपती शिवाजी महाराज जयंती समितीने ६ मार्च रोजी तिथीनुसार होणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज जयंती महोत्सवाची तयारी सुरू केली आहे. या महोत्सवासाठी नूतन कार्यकारिणी घोषित करण्यात आली असून, ज्येष्ठ विधीज्ञ आणि स्वीकृत नगरसेवक ड. प्रशांत देशपांडे यांची स्वागताध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे.

गणेशदास गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत नव्या पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. ड. देशपांडे यांच्यासोबत नगरसेवक आशिष अतकरे यांनाही स्वागताध्यक्षपदाचा मान देण्यात आला आहे. याशिवाय, भारतीय जनता पार्टीचे महानगर जिल्हाध्यक्ष डॉ. नितीन धांडे यांच्यावर समितीच्या अध्यक्षपदाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे.



महोत्सवांतर्गत, शुक्रवार, ६ मार्च रोजी सकाळी ८ वाजता पुरातन सोमेश्वर मंदिरात समितीच्या वतीने भगवान महादेवाला दुग्धाभिषेक करण्यात येणार आहे. हा जन्मोत्सव सोहळ्याचा एक भाग असेल.त्यानंतर सायंकाळी ५ वाजता मनपा शाळा क्रमांक ६ च्या प्रांगणात छत्रपती शिवरायांचे पालखीपूजन केले जाईल. येथून विविध देखावे, ढोल पथक, आतिषबाजी आणि टाळ-मृदुंगांच्या दिंड्यांसह भव्य महाशोभायात्रा काढण्यात येणार आहे. ही शोभायात्रा शहरातील विविध मार्गांवरून मार्गक्रमण करून पुन्हा त्याच ठिकाणी विसर्जित होईल.

या बैठकीत विहिंपचे बंटी पारवानी व प्रा. किशोर बुरंगे यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. सचिव अशोक पांडे यांनी नूतन कार्यकारिणी घोषित केली. बैठकीच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते भारत माता, छत्रपती शिवाजी महाराज आणि स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. प्रास्ताविक सुधीर बोपुलकर यांनी केले.यावेळी विहिंपचे अध्यक्ष अनिल साहू, भाजपाचे ज्येष्ठ कार्यकर्ते अविनाश पाठक, माजी नगरसेविका गंगाताई खारकर, नगरसेविका लविनाताई हर्षे, कोषाध्यक्ष अभिनव हिरुळकर, सहकोषाध्यक्ष आशिर्वाद गौड, निलेश शर्मा, संयोजक प्रथमेश दलाल, सह संयोजक ओम आष्टीकर, व्यवस्थापक सुयोग खारकर, प्रसिद्धी प्रमुख ड. प्रथमेश गणेशकर, सह प्रसिद्धी प्रमुख आकाश गौड, तसेच सदस्य रवि पारवे, सुनील सावरकर, सुमित तिवारी, पंकज गायकवाड, अंकुश गुल्हाने, श्रवण मेहरे, उमेश कुशवाहा, अनिकेत जावरे, वैभव बेलसरे आदी उपस्थित होते.

# ६९ ग्रामपंचायतींच्या पोटनिवडणुकीसाठी अंतिम मतदार यादी जाहीर

## १०९ जागांसाठी निवडणूक कार्यक्रमाची प्रतीक्षा, अमरावती जिल्ह्यात तयारी पूर्ण

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२५अमरावती**

अमरावती जिल्ह्यात ६९ ग्रामपंचायतींच्या १०९ जागांसाठी होणाऱ्या पोटनिवडणुकांची तयारी अंतिम टप्प्यात आहे. जिल्हा प्रशासनाने मंगळवारी, २४ फेब्रुवारी रोजी यासाठीची अंतिम मतदार यादी जाहीर केली आहे.

ही मतदार यादी संबंधित ग्रामपंचायती, तलाठी कार्यालये, तसेच तालुका स्तरावरील पंचायत समिती आणि तहसील कार्यालयांमध्ये नागरिकांच्या माहितीसाठी उपलब्ध आहे. अंतिम मतदार यादी जाहीर झाल्यामुळे आता लवकरच या पोटनिवडणुकांचा कार्यक्रम घोषित होण्याची शक्यता आहे.

एकूण १०९ जागांपैकी ९८ सदस्य आणि ११ सरपंचांच्या जागांसाठी ही पोटनिवडणूक होणार आहे. विद्यमान पदाधिकाऱ्यांचे निधन किंवा राजीनाम्यामुळे या जागा रिक्त झाल्या आहेत, तर काही जागांवर सुरुवातीपासूनच उमेदवार न मिळाल्याने त्या रिक्त राहिल्या आहेत.



या मतदार यादीचे प्रारुप १६ फेब्रुवारी रोजी प्रसिद्ध करण्यात आले होते. त्यावर २० फेब्रुवारीपर्यंत आक्षेप आणि सूचना मागवण्यात आल्या होत्या. हरकतींवर सुनावणी घेतल्यानंतर मंगळवारी अंतिम मतदार यादी घोषित करण्यात आली.अमरावती तालुका वगळता जिल्ह्यातील इतर १३ तालुक्यांमधील गावांमध्ये या पोटनिवडणुका होणार आहेत. यामध्ये तिवसा, भातकुली, चांदूर रेल्वे, नांदगाव खंडेश्वर, धामणगाव रेल्वे, मोर्शी, वरुड, अचलपूर, चांदूर बाजार, दर्यापूर, अंजनगाव सुर्जी, धारणी आणि चिखलदरा या तालुक्यांचा समावेश आहे. या प्रत्येक तालुक्यातील अनेक गावांमध्ये रिक्त जागांसाठी निवडणूक प्रक्रिया पार पडेल.

# १५ व्या वित्त आयोगातील खुर्ची खरेदी प्रकरण गाजणार?

## दोषी ग्रामविकास अधिकाऱ्यावर कारवाईचा विलंब

### भाजपचा आंदोलनाचा इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२५ अमरावती**

जिल्हा परिषद अमरावती अंतर्गत येणाऱ्या दर्यापूर तालुक्यातील येवदा ग्रामपंचायतीमध्ये १५ व्या वित्त आयोगाच्या निधीतून करण्यात आलेल्या नीलकमल खुर्ची खरेदी प्रकरणात आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे चौकशीत स्पष्ट झाल्याची माहिती समोर आली आहे. मात्र, दोषी आढळूनही संबंधित ग्रामविकास अधिकाऱ्यावर अद्याप कोणतीही ठोस प्रशासकीय कारवाई न झाल्याने या प्रकरणाला नवे वळण मिळाले आहे.

गटविकास अधिकारी, दर्यापूर यांनी दि. १८ ऑगस्ट २०२५ रोजी सादर केलेल्या अहवालात संबंधित ग्रामविकास अधिकारी दोषी असल्याचे नमूद करण्यात आले आहे. त्यानंतर उपमुख्य कार्यकारी अधिकारी,



जिल्हा परिषद अमरावती यांनी दि. १६ ऑक्टोबर २०२५ रोजी पत्राद्वारे नियमानुसार योग्य ती कारवाई करण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या होत्या. तरीही आजतागायत कोणतीही प्रशासकीय अथवा कायदेशीर कार्यवाही झालेली नसल्याची बाब पुढे आली आहे.या संदर्भात भारतीय जनता पार्टी अनुसूचित जाती मोर्चाचे जिल्हाध्यक्ष नकुल सोनटक्के यांनी गंभीर आरोप करत म्हटले आहे की, ग्रामविकास अधिकारी दोषी आढळूनही हेतुपुरस्सर कार्यवाहीस टाळाटाळ केली जात आहे. आर्थिक भ्रष्टाचार करणाऱ्या अधिकाऱ्याची पंचायत प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून पाठराखण होत असल्याचा संशय आहे.सोनटक्के यांनी पुढे इशारा दिला की, तात्काळ कठोर कारवाई न झाल्यास जिल्हा परिषद व पंचायत समिती प्रशासनाविरोधात तीव्र आंदोलन छेडण्यात येईल. शासनाच्या निधीचा गैरवापर करणाऱ्यांवर कारवाई झाली पाहिजे, अन्यथा प्रशासनाच्या पारदर्शकतेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण होईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.दरम्यान, या प्रकरणाकडे सर्वसामान्य नागरिकांचे लक्ष लागले असून, जिल्हा परिषद प्रशासन यावर कोणती भूमिका घेते याकडे राजकीय वर्तुळासह ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.-

# मेळघाट मनरेगा मजुरांच्या बँक खात्यामध्ये २८ कोटी

## होळीनिमित्त आदिवासी बांधवांना दिलासा

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२५अमरावती**

मनरेगा होळीनिमित्त राज्यातील मजुरांसाठी ६७ कोटींचा निधी मंजूर केला. यातील २८ कोटी ३९ लाखांचा निधी मेळघाटसाठी मंगळवारी उपलब्ध झाला आहे. हा निधी मजुरांच्या खात्यात जमा करण्यात आला आहे. होळीनिमित्त आदिवासींना दिलासा देण्यासाठी राज्य शासनाने रोजगार हमी योजनेअंतर्गत मजुरांना मजुरी अदा करण्यासाठी ६७-कोटींचा निधी मंजूर केला.



याची देयके कोषागाराकडे सादर करण्यात आली. त्यानुसार आज मजुरीची रक्कम थेट मजुरांच्या बँक खात्यात जमा करण्यात आली. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत अकुशल मजुरांना रोजगार उपलब्ध करून दिला जातो. मेळघाट या आदिवासीबहुलजिल्ह्यांमध्ये मजुरांना काम देताना वाढीव लेबर बजेट मान्यतेचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे विचाराधीन असल्यामुळे काही कालावधीपासून मजुरी अदा करणे प्रलंबित होते. या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने हा महत्त्वपूर्ण निर्णय घेऊन मजुरांची मजुरी तातडीने जमा केली आहे. मजुरीचा निधी तातडीने मिळावा, यासाठी मनरेगा आयुक्त डॉ. भरत बास्टेवाड यांनीही याबाबत पाठपुरावा केला आहे. केंद्र शासनाने १९ फेब्रुवारी रोजी राज्याच्या १३ कोटी मनुष्यदिवसांच्या लेबर बजेटमध्ये वाढ करून सुधारीत १६ कोटी मनुष्य दिवसांच्या बजेटला मान्यता दिली आहे. त्यामुळे मार्च अखेरपर्यंत मजुरांना नियमित रोजगार उपलब्ध होऊन मजुरी वेळेत अदा केली जाणार आहे.

# बांठीया समितीच्या शिफारशीप्रमाणे निवडणुका घ्या

## शासन वेळकाढूपणा करत असल्याचा जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांचा आरोप



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२५ अमरावती**

जिल्हा परिषद निवडणुका बांठीया समितीच्या शिफारशींनुसार घेण्यात याव्यात, मात्र ५० टक्क्यांपेक्षा जास्त आरक्षण असलेल्या जागांवर सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिल्यामुळे प्रक्रिया रखडली आहे. दरम्यान, १२ जिल्हा परिषदांच्या निवडणुका पार पडल्या असताना उर्वरित २२ जिल्हा परिषद निवडणुकांबाबत शासन जाणूनबुजून वेळकाढूपणा करत असल्याचा आरोप काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांनी केला आहे.बांठीया समितीच्या शिफारशीप्रमाणे राज्यातील जिल्हा परिषद निवडणुका घेणे अपेक्षित होते. मात्र, ५० टक्क्यांपेक्षा जास्त आरक्षण असलेल्या जागांवर सुप्रीम कोर्ट यांनी स्थगिती दिल्यामुळे अनेक ठिकाणी निवडणूक प्रक्रिया अडकून पडली आहे.दरम्यान, राज्यातील १२ जिल्हा परिषदांच्या निवडणुका पूर्ण झाल्या असल्या तरी उर्वरित २२ जिल्हा परिषदांबाबत अद्याप स्पष्टता नाही. या पार्श्वभूमीवर काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांनी शासनावर टीका करत, बांठीया समितीच्या निकषांनुसार ५० टक्के आरक्षण ठेवून निवडणुका तात्काळ जाहीर कराव्यात, अशी मागणी केली आहे.शासन मुद्दाम वेळकाढूपणा करत असून स्थानिक स्वराज्य संस्थांची लोकशाही प्रक्रिया लांबणीवर टाकली जात असल्याचा आरोपही त्यांनी केला. यामुळे प्रशासनावर ताण वाढत असून जनतेचे प्रतिनिधित्वही प्रलंबित राहिल्याचे त्यांनी नमूद केले.

# श्री समर्थ सद्गुरू खोलटे महाराज देवस्थानला तीर्थक्षेत्राचा ‘क’ दर्जा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२५वरूड :**

तालुक्यातील श्रीक्षेत्र घोराड येथील कर्मयोगी श्री समर्थ सद्गुरू खोलटे महाराज देवस्थानला महाराष्ट्र शासनाने तीर्थक्षेत्राचा ’क’ दर्जा दिला आहे. याबद्दल देवस्थान समितीच्यावतीने आ. उमेश यावलकर यांचा हृद्य सत्कार करण्यात आला. यावेळी ग्रामस्थांसह भाजप पदाधिकारी उपस्थित होते.



व्यासपीठावर सेवानिवृत्त शिक्षक रमेश अकर्ते, मधुकर पेलागडे, हितेश जरुले, ह.भ.प. उमेश कोडलकर, ह.भ.प. दर्शन गावंडे, स्वप्निल चौधरी उपस्थित होते. सत्काराला उत्तर देताना आ. यावलकर यांनी देवस्थानच्या सर्वांगीण विकासकामासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून देण्याचे तसेच घोराड पुनर्वसन ते सदावर्ती नदीपर्यंतचा अपूर्ण रस्ता पूर्ण करण्यासाठी निधी उपलब्ध करण्यात येईल, असे सांगितले. संचलन रमेश अकर्ते यांनी केले. आभार प्रदर्शन विनायक भुते यांनी मानले. देवस्थानचे पदाधिकारी व भक्तगण रमेश अकर्ते, हितेश जरुले, मधुकर पेलागडे, मंगेश वहोकर, विनायक भुते, गजानन फुके, रवींद्र सावरकर, श्रीकांत उमाळे, शंकरराव यावले यांनी परिश्रम घेतले.

# कुख्यात गुंड शेख शहबाजवर ‘एमपीडीए’ अंतर्गत कारवाई

## पोलीस आयुक्तांचा गुन्हेगारांना दणका




**विदर्भ प्रजासत्ताक दि.२५अमरावती** शहरातील शांतता व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी अमरावती शहर पोलिसांनी सराईत गुन्हेगारांविरुद्ध कडक मोहीम उघडली आहे. याच मोहिमेअंतर्गत नागपुरी गेट पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कुख्यात गुन्हेगार शेख शहबाज उर्फ मुरारी शेख कलीम (वय २५, रा. झिब्राईल बाबा दर्गा जवळ, पठाण चौक) याच्यावर ’एमपीडीए’कायद्यान्वये स्थानबद्धतेची कारवाई करण्यात आली आहे. पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी २३ फेब्रुवारी रोजी या कारवाईचे आदेश निर्गमित केले.शेख शहबाज हा सन २०१८ पासून अमरावती शहरात सक्रिय आहे. त्याच्यावर नागपुरी गेट, खोलापुरी गेट आणि सिटी कोतवाली पोलीस ठाण्यांतर्गत खून, जबर दुखापत, घरफोडी, अश्लील कृत्य करणे, अवैध अग्निशस्त्रे व घातक शस्त्रे बाळगणे, आणि तडीपार आदेशांचे उल्लंघन करणे असे एकूण ७ गंभीर गुन्हे दाखल आहेत. वारंवार प्रतिबंधात्मक कारवाई करूनही त्याच्या गुन्हेगारी कारवाया थांबत नसल्याने ही कठोर पाऊले उचलण्यात आली आहेत. पोलीस आयुक्तांच्या आदेशानंतर शेख शहबाजला ताब्यात घेऊन २३ फेब्रुवारी रोजी अमरावती मध्यवर्ती कारागृहात दाखल करण्यात आले आहे.

# कृषीपंपाचे साहित्य चोरणाऱ्या टोळ्या सक्रिय

## कारवाई करण्याची शेतकऱ्यांची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२५तिवसा** – ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर शेतीपयोगी असलेले साहित्य रात्रीच्या अंधारात चोरी करणाऱ्या टोळ्या तालुक्यात सक्रिय झाल्या आहेत. विहिरीवरील मोटार, झटका मशीन, वीजकेबल, स्प्रिंक्लर, असे साहित्य चोरीला जात असल्याच्या तक्रारी पुढे येत आहेत. त्यामुळे या चोरट्यांचा तातडीने पोलिसांनी बंदोबस्त करावा, अशी मागणी शेतकऱ्यांकडून केली जात आहे. नापिकी व अतिवृष्टीमुळे आधीच शेतकरी हवालदिल झाला आहे. अशातच आता तालुक्यात शेतीसाहित्य चोरी करणाऱ्या भुरट्या चोरट्यांचा धुमाकूळ वाढत असल्यामुळे शेतकऱ्यांनी साहित्य ठेवावे तरी कुठे? हा मोठा प्रश्न त्यांच्या समोर उभा आहे. तालुक्यातील भारवाडी, अनकवाडी, शेंदूरजनाबाजारसह शहरालगत असलेल्या शेतातून रात्रीच्या काळोखात कृषी मोटार पंप, झटका मशीन, वीज केबल, स्प्रिंक्लर पाइप, असे साहित्य चोरी जात आहे. त्यामुळे या चोरट्यांना आवर घालून बेड्या ठोकाव्या, अशी मागणी तालुका काँग्रेस कमिटी व शेतकरी संघटनेकडून केली जात आहे.

# सहकारी संस्थांच्या निवडणुकांवरील स्थगिती उठली

## संस्थांच्या निवडणूक प्रक्रियेला येणार वेग

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२५अमरावती**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांना न्यायालयाने ब्रेक लावल्यानंतर आता राज्यातील प्रलंबित सहकारी संस्थांच्या निवडणुकांवरील स्थगिती उठली आहे. यामुळे या संस्थांच्या निवडणूक प्रक्रियेला गती मिळाली आहे. राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाच्या आदेशाने मध्येच स्थगित झालेल्या जिल्ह्यातील रखडलेल्या सहकारी संस्थांच्या निवडणुकांचा मार्ग मोकळा झाला आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमुळे पुढे ढकलण्यात आलेल्या सहकारी संस्थांच्या निवडणुका आता पुन्हा सुरू करण्याचे स्पष्ट निर्देश प्राधिकरणाने दिले आहेत. न्यायालयीन स्थगिती असलेल्या संस्था वगळता इतर सर्व संस्थांची निवडणूक प्रक्रिया ज्या टप्प्यावर थांबली होती, त्याच टप्प्यापासून तात्काळ सुरू करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या निर्णयामुळे जिल्ह्यात ‘अ’ वर्गातील बुलडाणा





बँकेसह ‘ब’ वर्गातील दोन सहकारी संस्थांच्या निवडणुकांना गती मिळणार आहे. यामध्ये धन्वंतरी रुग्णालय सहकारी संस्था व अमरावती जिल्हा सहकारी पतसंस्था यांच्या प्रलंबित निवडणुकाही पुढील टप्प्यात सुरू होणार आहेत. दरम्यान, अ व ब वर्गातील संस्थांना सुधारित निवडणूक कार्यक्रम तयार करून प्राधिकरणाच्या मान्यतेसाठी सादर करणे बंधनकारक राहणार आहे. अंतिम मतदारयादी जाहीर झालेल्या संस्थांनाही नियमानुसार पुढील प्रक्रिया राबवावी लागणार आहे. जिल्ह्यातील अकोला बँकेची निवडणूक यापूर्वीच न्यायालयाच्या आदेशानुसार सुरू झाली आहे, तर यवतमाळ बँकेच्या निवडणुकीवर अद्याप न्यायालयीन स्थगिती कायम आहे. प्राधिकरणाच्या या निर्णयामुळे सहकार क्षेत्रातील निवडणूक प्रक्रियेला गती येणार आहे.

# आरटीई प्रवेशासाठी अडीच हजारांवर अर्ज

## २२६ शाळा, २५४२ जागा : नामांकित शाळांकडे पालकांचा ओढा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२५अमरावती**

यंदा आरटीई प्रवेश निकषांत बदल करण्यात आले असून प्रवेशासाठी दहा शाळांचे पर्याय देण्यात आले आहेत. जिल्ह्यातील २२६ शाळांतर्गत २५४२ जागांसाठी आतापर्यंत अडीच हजार अर्ज सादर झाले आहेत. त्यामुळे यंदा आरटीई प्रवेशात चांगलीच चुरस पाहायला मिळणार आहे. शिक्षण हक्क कायद्यांतर्गत (आरटीई) एक किलोमीटर परिसरातील खासगी शाळांमध्ये प्रवेश घेता येणार आहे.




शालेय शिक्षण विभागाने याबाबतचे आदेश १२ फेब्रुवारी रोजी जारी केले आहेत. त्यानुसार ऑनलाइन प्रवेश अर्ज भरत असताना पालकांना पाल्याने प्रवेशासाठी जास्तीत जास्त कोणत्याही दहा शाळांचे पर्याय देता येणार आहेत. तसेच पोर्टलवर नोंदविण्यात आलेल्या पाल्याच्या निवासस्थानापासून एक किलोमीटर आणि त्याच्या आतील शाळा दर्शविण्यात येणार आहे. शिवाय लॉटरीमध्ये निवड झालेल्या विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी एकाच शाळेचे वाटप होईल. पालकांनी प्रवेशाच्या वेळी दर्शविलेला निवासाचा पत्ता आणि त्यांच्या आधार ओळपत्रावरील निवासाचा पत्ता एकच आहे, याची खात्री करण्यात येणार आहे.

# प्रदेश उपाध्यक्षपदी नियुक्तीनंतर प्रवीण पोटे-पाटील यांचा निर्धार

# विदर्भात भाजपची ताकद दुप्पट करणार

## कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण

**अरुण जोशी**

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५ अमरावती :**



भारतीय जनता पक्षच्या प्रदेश उपाध्यक्षपदी नियुक्ती झाल्यानंतर प्रवीण पोटे-पाटील यांनी विदर्भात पक्षाला नवसंजीवनी देण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. अमरावती शहर आणि जिल्ह्यासह संपूर्ण विदर्भात भाजपला पुन्हा 'नंबर वन' स्थानावर नेट पक्षाची ताकद दुप्पट करणार हेच आपले प्रमुख ध्येय असल्याचे त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले. दैनिक विदर्भ प्रजासत्ताक सोबत बोलतांना त्यांनी संघटन विस्तार आणि कार्यकर्त्यांचे सक्षमीकरण यावर भर देणार असल्याचे नमूद केले.

नियुक्तीबद्दल त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे आभार मानले. पक्षश्रेष्ठींनी दाखवलेल्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही, अशी ग्वाही देत त्यांनी पक्षसंघटन अधिक सक्षम करण्यासाठी राज्यभर दौरे आणि बैठका घेणार असल्याचे सांगितले.अलीकडील काळात पक्षांतर्गत काही ठिकाणी नाराजी आणि असंतोष दिसून आल्याची कबुली देत पोटे-पाटील म्हणाले की, सर्व ज्येष्ठ नेते व तळागाळातील कार्यकर्त्यांचा सन्मान राखत त्यांना मुख्य प्रवाहात आणले जाईल. 'घरवापसी' मोहिमेला गती देऊन असंतुष्ट कार्यकर्त्यांना पुन्हा सक्रिय केले जाईल. भाजप हा कार्यकर्त्यांचा पक्ष असून कार्यकर्त्यांची ऊर्जा हीच पक्षाची खरी ताकद आहे, असे ते म्हणाले. अमरावतीत पक्षाला पूर्वीचे वैभव मिळवून देण्यासाठी महिला मोर्चा, युवा मोर्चा, किसान आघाडी आणि विविध प्रकोष्ठ अधिक सक्रिय केले जातील. बूथस्तरावर संघटन मजबूत करून प्रत्येक वॉर्ड व गावात जनसंपर्क मोहीम राबवली जाईल. राज्य सरकारच्या लोककल्याणकारी योजनांची माहिती सर्वसामान्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवण्यावर भर दिला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.विदर्भातील प्रत्येक जिल्ह्याचा संघटनात्मक आढावा घेऊन ज्या ठिकाणी पक्ष कमकुवत आहे तेथे विशेष मोहीम राबवली जाईल, तर मजबूत भागात आणखी बळकटी दिली जाईल. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकीय तयारी, कार्यकर्त्यांचे प्रशिक्षण आणि स्थानिक प्रश्नांवर लक्ष केंद्रित करून जनतेमध्ये विश्वासाचे वातावरण निर्माण केले जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

एकता, शिस्त आणि समर्पणाच्या बळावर भाजपला अमरावतीसह संपूर्ण विदर्भात नव्या उंचीवर नेण्याचा संकल्प पोटे-पाटील यांनी यावेळी पुन्हा अधोरेखित केला.

### विधान परिषद निवडणूक लढणार प्रवीण पोटे पाटील; भाजप पुन्हा संधी देईल, विश्वास व्यक्त

ज्या दिवशी विधान परिषद निवडणुका जाहीर होतील, त्या वेळी भारतीय जनता पार्टी पुन्हा माझ्यावर विश्वास दाखवेल आणि मी निवडणुकीला सामोरे जाईन, असा ठाम विश्वास माजी मंत्री प्रवीण पोटे पाटील यांनी व्यक्त केला आहे.ते म्हणाले की, २०१२ मध्ये त्यांनी प्रथमच विधान परिषद निवडणूक लढवली आणि त्या वेळी चांगल्या मतांनी विजय मिळवला. त्यानंतर २०१७-१८ मध्येही भाजपने त्यांच्यावर विश्वास ठेवत उमेदवारी दिली आणि ते पुन्हा मोठ्या मताधिक्याने निवडून आले. पुढे मंत्रीपदाची जबाबदारी सांभाळताना त्यांचे काम तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जवळून पाहिले असल्याचे त्यांनी नमूद केले. आपल्या कार्यकाळात पारदर्शक आणि विकासाभिमुख कामकाज केले असल्याचा दावा करत, येत्या विधान परिषद निवडणुकीत पक्ष पुन्हा संधी देईल, याबाबत कोणतीही शंका नसल्याचेही पोटे पाटील यांनी स्पष्ट केले.

# नवीन गव्हाचे बाजार समितीत आगमन

## निर्यातीच्या पार्श्वभूमीवर गव्हाचे दर तेजीत राहण्याची शक्यता

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२५अमरावती**

उन्हाळ्याची चाहूल लागताच कृषी उत्पन्न बाजार समितीत नव्या गहू आणि ज्वारीची आवक वाढू लागली आहे. यंदा मान्सूनमध्ये झालेल्या विक्रमी पावसामुळे जमिनीतील ओलावा दीर्घकाळ टिकून राहिला. तसेच सिंचन प्रकल्पांमध्ये मुबलक जलसाठा उपलब्ध असल्याने रब्बी हंगामातील गव्हाला पोषक वातावरण मिळाले. परिणामी, जिल्ह्यात गव्हाच्या उत्पादनात लक्षणीय वाढ झाली आहे.अत्याधुनिक यंत्रसामग्रीचा वापर, सुधारित बियाणे आणि योग्य वेळी खत व्यवस्थापन केल्याने हेक्टरी उत्पादनात सरासरी ५ ते ७ क्विंटलने वाढ झाल्याचे चित्र आहे. शेतकऱ्यांनी पिक व्यवस्थापनात घेतलेली दक्षता आणि हवामानाची साथ यामुळे गव्हाची प्रतही उत्तम असल्याचे व्यापाऱ्यांचे मत आहे.सध्या बाजार समितीत गव्हाची प्रतवारीनुसार आवक होत आहे. नवीन गव्हाला प्रति क्विंटल २,८०० ते ३,५०० रुपयांपर्यंत भाव मिळत आहे. वाणानुसार दरात फरक दिसून येत आहे. लोकवन, शरबती, सिहोर या वाणांना विशेष मागणी असून, चांगल्या प्रतीचा व फिल्टर केलेला गहू बाजारात ५०० ते ७०० रुपयांपर्यंत अधिक दराने विकला जात आहे. आवक वाढत




जाईल तसे दरात काही प्रमाणात चढ-उतार होण्याची शक्यता व्यापाऱ्यांनी व्यक्त केली आहे.दरम्यान, रशिया-युक्रेन युद्ध आणि जागतिक बाजारातील वाढती मागणी यामुळे गव्हाच्या दरावर सकारात्मक परिणाम होऊ शकतो, असेही जाणकारांचे मत आहे. केंद्र सरकारने गहू निर्यातीला दिलेल्या मंजुरीमुळे देशांतर्गत बाजारात दर स्थिर किंवा तेजीत राहण्यास आधार मिळत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या मालाला समाधानकारक मोबदला मिळण्याची अपेक्षा आहे.गव्हाच्या तुलनेत ज्वारीच्या पेरणी क्षेत्रात काहीशी घट झाली आहे. मका आणि इतर नगदी पिकांकडे शेतकऱ्यांचा कल वाढल्याने ज्वारीचे उत्पादन घटले आहे. परिणामी, नव्या ज्वारीला प्रति क्विंटल ४,००० ते ५,५०० रुपयांपर्यंत दर मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे.यंदा गव्हाची प्रत उत्तम आहे.

# मराठी शाळा वाचवा : AISF चा जिल्हाधिकारी कार्यालयावर एल्गार मोर्चा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५ अमरावती-**




शासनाच्या कमी पटसंख्या असलेल्या शाळा बंद करण्याच्या निर्णयाविरोधात ऑल इंडिया स्टुडंट्स फेडरेशन (-खडऋ) अमरावती जिल्ह्याच्या वतीने आज जिल्हाधिकारी कार्यालयावर विद्यार्थी, पालक, शिक्षक व नागरिकांचा भव्य एल्गार मोर्चा काढण्यात आला. ग्रामीण व दुर्गम भागातील मराठी शाळा बंद केल्यास गरीब, शेतकरी, आदिवासी व बहुजन समाजातील विद्यार्थ्यांचे शिक्षण धोक्यात येईल, असा आरोप यावेळी करण्यात आला.शासन २० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळांचे समायोजन करत असल्याने शिक्षण हक्क कायद्याचे उल्लंघन होत असल्याचा निषेध व्यक्त करण्यात आला. राष्ट्रीय शिक्षण धोरणाअंतर्गत 'शाळा संकुल' संकल्पनेमुळे विद्यार्थ्यांना २० ते ३० किमी दूर शाळेत जावे लागणार असून मुलींच्या शिक्षणावर त्याचा विपरीत परिणाम होईल, अशी भीती व्यक्त करण्यात आली. शिक्षणाचे खासगीकरण वाढत असून खाजगी शाळांच्या वाढत्या शुल्कामुळे सर्वसामान्यांना शिक्षण परवडणार नाही, असे आंदोलनकर्त्यांनी म्हटले.मोर्चाच्या प्रमुख मागण्यांमध्ये शाळाबंदीचा निर्णय तात्काळ रद्द करणे, शिक्षक भरती करणे, ठढएनुसार भौतिक सुविधा उपलब्ध करणे, शालेय पोषण आहारात सुधारणा करणे, शिक्षणावर ऋऊझच्या किमान ६% खर्च करणे आदींचा समावेश आहे. केरळच्या धर्तीवर पदवीपर्यंत मोफत शिक्षण लागू करावे, अशीही मागणी करण्यात आली.-खडऋच्या राज्यासचिव प्रतीक्षा डोके यांच्या नेतृत्वाखाली धीरज बनकर, सुप्रिया राऊत, दीप सावळे, राम जोशी आदींसह विविध शिक्षक व कामगार संघटनांनी सहभाग नोंदवला. शासनाने सकारात्मक निर्णय न घेतल्यास आंदोलन तीव्र करण्याचा इशारा देण्यात आला.

# राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी घेतले संत गजानन महाराज समाधीचे दर्शन

## संत गजानन महाराज संस्थान, शेगाव मंदिर परिसराची केली पाहणी





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५ बुलडाणा,**

भारताच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज बुलडाणा जिल्ह्यातील शेगाव येथील संत श्री गजानन महाराज समाधीचे दर्शन घेतले.

यावेळी महाराष्ट्राचे राज्यपाल आचार्य देवव्रत, केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण, आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव, संत गजानन महाराज संस्थानचे विश्वस्त निळकंठ शिवशंकर पाटील, हरिहर निळकंठ पाटील यांच्यासह आयुष मंत्रालयाचे वरिष्ठ अधिकारी आणि अन्य मान्यवर उपस्थित होते.

प्रारंभी संत श्री गजानन महाराज संस्थानच्यावतीने महामहिम राष्ट्रपती श्रीमती मुर्मू यांचे औक्षण करून स्वागत करण्यात आले. यानंतर राष्ट्रपती महोदयांनी

संत श्री गजानन महाराज यांच्या समाधीस्थळाचे दर्शन घेतले. त्यानंतर त्यांनी मंदीर परिसराची माहिती घेत पाहणी केली.यानंतर राष्ट्रपती महोदयांचे राष्ट्रीय आरोग्य मेळावा मुख्य कार्यक्रमस्थळी प्रस्थान झाले.



# लोकसभाग व शासकीय निधी अभिसरणातू होणार शेत रस्ता

## खासदार बळवंतराव वानखडे यांनी केले भूमिपूजन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अंजनगाव सुर्जी**



शेतकऱ्यांच्या जाण्या येण्यासाठी मोठ्या प्रमाणात रस्त्याची दुर्दशा झाली असल्याने त्यासाठी पानंद रस्त्याची आवश्यकता भासत असून त्यासाठी शासनाने सुद्धा मोठ्या प्रमाणात जीक्रीचे प्रयत्न करीत असल्याचे दिसत आहे.हंतोडा येथील जुना रस्ता पोही जाणाऱ्या रस्त्यांची दशा वाईट झाली असल्याचे दिसून आले होते विशेष करून या रस्त्याने मोठ्या प्रमाणात पोही. विहिगाव .हंतोडा या शेतकऱ्यांची शेतजमीन असल्याने त्यांना जाण्याचा व शेतमाल शेतातून बाजार समिती नेण्या करिता खूप मोठ्या प्रमाणात अडचण जात होती अखेर दिनांक २३ फेब्रुवारी चे अवचित्य साधून संत गाडगेबाबा यांच्या जयंतीनिमित्त रस्त्याचे भूमिपूजन तसेच पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर समृद्धी शेतजोड रस्ता व जलपुनर्वभरण म्हणून योजनेअंतर्गत तसेच लोकसहभागातून व शासकीय निधी अभिसरणातून हंतोडा जुना फाटा ते पोही या रस्त्याचे भूमिपूजन करण्यात आलेया उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे खासदार बळवंत वानखडे अमरावती लोकसभा , उपजिल्ह ाधिकारी घ्यार साहेब. राजेश्वर हांडे उपविभागीय अधिकारी. तहसीलदार पुष्पा सोळंके .विजय विल्हेकर, भैय्यासाहेब भारसाकडे. नितेश जटाले . आनंद संगई. रवींद्र हंतोडकर, लोकजागर सघतनेचे इतर पदाधिकारी व देवानंद महल्ले .रवींद्र काळे नाय तहसीलदार. विजय भगत नायब तहसीलदार. रामागडे पुरवठा विभाग इत्यादी या शेतीवर जोड रस्त्या भूमिपूजनासाठी उपस्थित होते जेष्ठ नागरिकांनी पाहुण्यांचे स्वागत केले व हतोडा येथिल पादन रस्त्याचे भूमिपूजन झाल्याबद्दल विशाल हंतोडकर यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले.विशेष सहकार्य रामचंद्र कहाणे, प्रवीण फाटे, विशाल हतोडकर , भूषण पटेल, असलम भाई, भूषण फाटे, मयूर नायटकर, सुनील गोळे, उमेश उमक, विनोद माहोरे, साबिर भाई,गजानन आठवले ,सत्यविजय उंबरकर उपसरपंच तसेच तायडे तलाठी यांचे होते

# राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेत सामिना शेख प्रथम

## अमरावतीचा गौरव

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अमरावती**




राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धा २०२५-२६ मध्ये अमरावती जिल्ह्याने उल्लेखनीय कामगिरी करत सहा कर्मचाऱ्यांनी राज्यस्तरावर आपली छाप पाडली. प्राथमिक शिक्षक गटातून जिल्हा परिषद उर्दू शाळा, धामोरी येथील समिना शेख अनिस यांनी प्रथम क्रमांक पटकावत जिल्ह्याचे नाव उज्ज्वल केले. त्यांच्या आओ नई खिडकी खोले या ग्रंथालय-आधारित नवोपक्रमाने परीक्षकांची मने जिंकली.राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे येथे २३ फेब्रुवारी रोजी अंतिम सादरीकरण तर २४ फेब्रुवारी रोजी पारितोषिक वितरण सोहळा पार पडला. स्पर्धेत राज्यातून १०७० शिक्षक, शिक्षकेत्तर व अधिकारी सहभागी झाले होते. अमरावतीतून पूर्वप्राथमिक गटात प्रियंका खरकाटे व सारिका धामोळे, माध्यमिक गटात स्वप्नील वानखडे व विनायक ताथोड, तसेच पर्यवेक्षकीय अधिकारी गटात डॉ. विजय शिंदे यांनी सहभाग नोंदवत पारितोषिक मिळविले.समिना शेख यांच्या उपक्रमातून धामोरी गावात 'घरोघरी पुस्तक कप्पा' संकल्पना रुजली. शाळेत 'पुस्तक दानपात्रा'द्वारे ८०० हून अधिक पुस्तके संकलित झाली असून 'रीडर ऑफ द विक' व 'रीडर ऑफ द मंथ' पुरस्कारांमुळे विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी वाढली आहे. या यशामुळे अमरावती जिल्ह्याचा शैक्षणिक क्षेत्रात मान उंचावला आहे.

# चांदुर बाजारात सिसिटीव्ही कॅमेरा विना धावतात शालेय बस

## सिबीएसई शाळा व्यवस्थापनाचे दुर्लक्ष, तर मान्यता रद्द करा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५चांदुर बाजार**

शाळेतील लहान मुलांच्या सुरक्षितेत वाढ होण्यासाठी शालेय बसमध्ये आता महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळ तसेंच केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळच्या निर्देशानुसार जीपीएस,सीसीटीव्ही कॅमेरे आणि वेग नियंत्रक बसविण्याच्या सूचना केल्या आहे मात्र चांदुर बाजार तालुक्यात एकाही शालेय बसमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे नसल्याने शिक्षण मंडळाले लागु केलेल्या नियमांचे ३-१३ वाजल्याचं दिसून येत आहे चांदुर बाजार तालुक्यात शालेय विध्यार्थ्यांची वाहतूक करण्यासाठी १२८ पेक्षा अधिक वाहने धावतात तर यापैकी ६८ पेक्षा अधिक शालेय वाहणांची प्रादेशिक परिवहन विभागाकडे नोंदनी झाली आहे तर यापैकी शालेय वाहणांची नोंदणी नसतांनाही विध्यार्थ्यांची वाहतूक करणे धोकादायक ठरू शकते यावर आता प्रादेशिक परिवहन विभागाने दखल घेणं गरजेच असल्याच पालकांची मागणी आहे चांदुर बाजार तालुक्यातील ग्रामीण भागातील ४५ गावांमधून शालेय बसमध्ये विध्यार्थी प्रवास करतात तर तालुक्यात एकाही शालेय बसमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे नसल्याच आढळल आहे शालेय बसच्या खिडकीवर तारेची जाळीही नसल्याच चित्र आहे माध्यमिक शिक्षण मंडळाच्या परिपत्रकानुसार सीसीटीव्ही कॅमेरा आणि जीपीएस प्रणाली या वाहनामध्ये बंधनकारक करण्यात यावी आणि ही उपकरणे कायम चालू स्थितीत असावीत मुलांच्या सुरक्षिततेसाठी एक वाहतूक व्यवस्थापक आणि



प्रशिक्षित महिला सेवकाची नियुक्ती करावी शालेय बसमध्ये एक मोबाइल फोन ठेवण्यात यावा त्याचा वापर आपत्कालीन स्थितीमध्ये विद्यार्थ्यांना करता येईल तसेच विद्यार्थ्यांना वाहतूक सुविधा आणि चालकाबाबतची प्रतिक्रिया द्यावी असे यामध्ये म्हटले आहे तर अशा नियमांना चांदुर बाजार तालुक्यातील शाळा व्यवस्थापन व मुख्यध्यापक दुर्लक्ष करित आहे

### तर, सीबीएसई शाळेची मान्यता रद्द करा

शालेय बसला झालेल्या कोणत्याही चुकीसाठी व्यवस्थापन आणि शाळेचे मुख्याध्यापक जबाबदार ठरविण्यात यावे तसेच अशा शाळांची मान्यताही रद्द करण्यात यावी विध्यार्थ्यांच्या पालकांक़डून वार्षिक शिक्षणासाठी ५० हजार रु पेक्षा अधिक खर्च सीबीएसईच्या शाळा व्यवस्थापन घेतात तर शालेय बसचा खर्च ही यामध्ये लादल्या जातो लाखो रुपयांचा खर्च करून विध्यार्थ्यांची गैरसोय का होत आहे असा प्रश्न निर्माण झाला असून सीबीएसई च्या परिपत्रकानुसार शालेय बसमध्ये घंटा आणि भोंगा (सायरन) बसविण्यात यावा प्रत्येक बसमध्ये शाळा प्रशासनाने सीसीटीव्ही कॅमेरे व जीपीएस प्रणालीचा वापर करावा अन्यथा अशे न केल्यास चांदूर बाजारातील सीबीएसई शाळेची मान्यता रद्द करण्याची मागणी आता नागरिक करित आहे.

**सिसिटीव्ही कॅमेरे व जीपीएस यंत्रणा लावणे आवश्यक** - चांदुर बाजार तालुक्यात धावणाऱ्या सर्व शालेय बस, व्हॅन मध्ये विध्यार्थ्यांसाठी सुरक्षा व्यवस्था वाढवावी वाहतुकी दरम्यान विध्यार्थ्यां सोबत होणाऱ्या घडामोडी वर नियंत्रण ठेवण्या साठी सिसिटीव्ही कॅमेरे व जीपीएस यंत्रणा लावणे आवश्यक आहे.

**-योगेश इसळ**जिल्हा काँग्रेस कमिटी, पदधिकारी चांदुर बाजार.


आता आपल्या मोबाईल वरच वाचा
राज्यासह जिल्ह्यातील महत्वाच्या घडामोडी
दररोज रात्री 8 वाजता वाचा
निवांत!!
सांध्य दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
राजकीय,सामाजिक,कृषी,शैक्षणिक,क्रीडा,क्राईम
विश्वातील सर्व घडामोडी वाचा आता आमच्या सोबत